# महापौर छायाचित्र स्पर्धा व प्रदर्शनाचे उद्घाटन




ठामपा व फोटो सर्कल सोसायटी, ठाणे यांच्यातर्फे ८ व्या वार्षिक ठाणे महापौर छायाचित्र स्पर्धा आणि प्रदर्शनाचे उद्घाटन शिवसेना नेते मनोहर जोशी यांच्या हस्ते गडकरी रंगायतन येथे संपन्न झाले. छायाचित्रकार काकुभाई कोठारी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ठाण्याचे महापौर राजन विचारे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमास उपमहापौर गणेश साळवी तसेच गोपाळ लांडगे, नरेश म्हस्के उपस्थित होते.

खा.जोशी यांनी छायाचित्रकारांचे कौतुक करून स्पर्धेतील छायाचित्रांची प्रशंसा केली. महापौर विचारे यांनी फोटो सर्कल सोसायटी सातत्याने छायाचित्रांच्या दर्जात अचुकता आणत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. ठामपा छायाचित्रकलाकारांचे कौतुक करते याबाबतीत अन्य महापालिकांनी देखील सकारात्मक दृष्टीकोन ठेवावा ही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र जनमुद्रा - 14-10-06